RNI No. MAHBIL/2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १२, अंक - ११ ] गुरुवार, दिनांक ऑक्टोबर १९, २०२३ / आश्विन २७, शके १९४५ [ पृष्ठे ०३

**असाधारण क्रमांक ११**

## प्राधिकृत प्रकाशन

**जिल्हाधिकारी यांजकडून**

*महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ अन्वये*

**अधिसूचना**

क्रमांक पसन/कावि/कार्या-१/१९१२/२०२३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य शासनाने दिनांक २० डिसेंबर २०१२ रोजी महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ अधिनियमित केला होता.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महाराष्ट्र २७) च्या कलम ४ च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* व कलम ६-ब च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* नुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, (१९६५ चा ३) या अन्वये गठित केलेल्या वडगाव नगरपंचायतीच्या, नगरपंचायत क्षेत्राच्या बाबतीत दिनांक १ एप्रिल २०२३ पासून जमिनींचे किंवा इमारतींचे भांडवली मूल्य मालमत्ता कराच्या आकारणीच्या मुलाधार म्हणून स्वीकारलेल्या, निवासी व निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या दरांचा प्रस्ताव नगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर, दर महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आता, त्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, १९६२ च्या कलम ४ च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(२)* व कलम ६-ब च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(२)* अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून जिल्हाधिकारी, पुणे यांना वडगाव नगरपंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याने, जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यक्षेत्रामधील वडगाव नगरपंचायतीच्या क्षेत्रासाठी निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या भांडवलीकृत मूल्यावर आधारित राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर ज्या दराने वडगाव नगरपंचायतीने आकारावयाचे व गोळा करावयाचे आहेत, ते दर जिल्हाधिकारी, पुणे याद्वारे सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०२३ पासून अधिसूचित करीत आहे.

**अनुसूची-१**

**(महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर दर)**

| अ. क्र. | वापरकर्ता प्रवर्ग | शिक्षण उपकर गुणांक | रोजगार हमी उपकर गुणांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | **वापरकर्ता प्रवर्ग : निवासी इमारत**<br>बंगला, तळघर किंवा पोडीयममधील कार पार्किंग, क्लब हाउस, दुमजली सदनिका / अपार्टमेंट, पेंट हाउस, खोली किंवा सदनिका किंवा अपार्टमेंट किंवा गाळा व तत्सम रो-हाउस, जलतरण तलाव, शैक्षणिक संस्था व इतर निवासी ठिकाणे. | ०.०१ % | लागू नाही. |

**अनुसूची-१**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| २ | **वापरकर्ता प्रवर्ग : औद्योगिक इमारत**<br>तळघर / पोडीयममधील कार पार्किंग, बंदिस्त गॅरेज, रिफायनरी factory, औद्योगिक वसाहत, औद्योगिक कारखाने, सूतगिरणी, द्राक्ष व त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग, तात्पुरते पावसाळी छत (temporary weather shed), धर्मशाळा, तारांकित व अतारांकित हॉटेल, मॉल, सर्व्हिस अपार्टमेंट, ऑटोमॅटिक टेलर मशीन आणि मनी चेंजिंग मशीन, टॉवर, मालमत्ता व्यवस्थापन कंपनी, म्युच्युअल फंडची कंपनी, बँकेतर वित्तीय संस्था, जीवन व जीवनोत्तर विमा निगम किंवा कंपनी इत्यादी. | ०.०३ % | ०.०१ % |
| ३ | **वापरकर्ता प्रवर्ग : अनिवासी इमारती**<br>तळघर / पोडीयममधील कार पार्किंग, खाजगी हेल्थ क्लब, जिम्नॅशिअम, सहकारी पतसंस्था, शिकवणी वर्ग, दवाखाना, क्लिनिक आणि pathology laboratory, विद्युत उपकेंद्र, जोडलेले गॅरेज, फिल्म शुटिंग स्टुडिओ, गोदाम, साठवण / कोठार, हॉस्पिटल, नर्सरी, किड्स कॉर्नर, प्लेग्रुप, नर्सिंग होम, रेस्टॉरंट व बार, दुकान, विविध वस्तू भांडार आणि शॉपिंग सेंटर, सोसायटी कार्यालय, विशेष कार पार्किंग बांधकाम, तबेला, जनावरांचा गोठा, शेळीपालन व कुक्कुटपालन बांधकाम, अतिविशेष उपचार हॉस्पिटल, सशुल्क जलतरण तलाव, जाहिरात फलक, वाहनकाटा / वजनकाटा, मंगल कार्यालय, हॉल, कन्वेन्शनल हॉल, कम्युनिटी हॉल, पार्टी हॉल, बँक, खुले सिनेमागृह, रंगमंच, सिनेमा हॉल / सिनेमागृह / नाट्यगृह, मल्टिप्लेक्स इत्यादी. | ०.०२ % | ०.००५ % |
| ४ | **वापरकर्ता प्रवर्ग : जमीन (खुली जमीन )**<br>निवासी कारणासाठीची खुली जागा, कोसळलेल्या इमारतीखालील जमीन, मनोरंजन उद्यान, खुल्या सिनेमागृहाची जमीन, वाहनकट्टा भोवतालची जमीन, पेट्रोलपंप / सर्व्हिस सेंटर / एलपीजी, सीएनजी स्टेशन / केरोसिन स्टेशन यांची जमीन, तसेच मोकळी जमीन, औद्योगिक कारणासाठीची जमीन, वाणिज्यिक कारणासाठीची जमीन व इतर खुल्या जमिनी. | ०.०१ % | लागू नाही. |

**डॉ. राजेश देशमुख,**

पुणे, १८ ऑक्टोबर २०२३. जिल्हाधिकारी, पुणे.

---

## BY COLLECTOR

*Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012*

## NOTIFICATION

क्रमांक पसन/कावि/कार्या-१/१९१२/२०२३.— Whereas, The Government of Maharashtra has enacted The Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012 on 20th December 2012.

and whereas, sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 4 and sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 (Mah. XXVII of 1962) as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012 empowers the Collector to notify the rates of a Tax on Lands and Buildings used or intended to be used for a Residential and Non-Residential purpose to be levied with effect from 1st day of April 2023 in the Municipal area of Vadgaon Nagarpanchayat constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and industrial Townships Act, 1965 by Notification in Maharashtra Government Gazette on receipt of the proposal from Vadgaon Nagarpanchayat for that purpose.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 4 and sub-clause *(ii)* of Clause (a) Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012, the Collector, Pune upon receipt of proposal from Vadgaon Nagarpanchayat, hereby notifies the

rates of a Tax on Lands and Buildings used or intended to be used for a Residential and Non-Residential purpose at which the State Education Cess and Employment Guarantee Cess on capital value of lands and buildings shall be levied and collected by the Vadgaon Nagarpanchayat as mentioned in the Schedule appended hereto in the municipal area within the jurisdiction of Collector, Pune with effect from the 1st day of April 2023.

**SCHEDULE - 1**

**Maharashtra Education and Employment Guarantee Cess Rate**

| Sr. No. | User Category | Education Cess | Employment Guarantee Cess |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | **User Category : Residential Building** Car parking in bungalow, basement or podium, club house, double store flat / apartment, pent house, room or flat or apartment or shop and similar, row house, swimming pool, educational institute and other residential places. | 0.01 % | N. A. |
| 2 | **User Category : Industrial Building** Car parking in basement / podium, closed garage, refinery factory, industrial estate, industrial factories, yarn mills, grape and its processing industries, temporary rain shed (temporary weather shed), workshops, starred and unstarred hotels, malls, service apartments, automatic tailor machines and money changing machines, towers, asset management companies, mutual fund companies, non- banking financial institutions, life and non-life insurance corporations or companies, etc. | 0.03 % | 0.01% |
| 3 | **User Category : Non-Residential Buildings** Car parking in basement / podium, private health club, gymnasium, co-operative credit institution, tuition class, dispensary, clinic and pathology laboratory, electrical substation, attached garage, film shooting studio, warehouse, storage / warehouse, hospital, nursery, kid's corner, playgroup, Nursing Home, Restaurant and Bar, Shop, Sundries and Shopping Centre, Society Office, Special Car Parking Construction, Stables, Animal Shed, Goat Farming and Poultry Farming Construction, Intensive Care Hospital, Paid Swimming Pool, Advertisement Board, Vehicle / Weight Scale, Marriage Hall, Conventional Hall, Community Hall, Party Hall, Bank, Open Cinema Theatre, Cinema Hall / Cinema Theatre, Multiplex, etc. | 0.02 % | 0.05 % |
| 4 | **User Category: Land (Open Land)** Residential open land, land under collapsed buildings, amusement park, open cinema land, land around banks, petrol pump / service center / LPG, CNG station / kerosene station land, as well as vacant land, land for industrial purposes, land for commercial purposes and other open land. | 0.01% | N.A. |

**Dr. RAJESH DESHMUKH,**

Pune, 18th October 2023. Collector, Pune.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.